महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षककार्यालय, यवतमाळ**

**दिनांक ११/०४/२०२३**

---

# साखरेचा ट्रकवर दरोडा टाकणाऱ्या टोळीस अवघ्या १० तासात अटक
## पो.स्टे.यवतमाळ शहर व स्थानिक गुन्हे शाखा चीसंयुक्तकामगीरी

दिनांक २३/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे योगेश नानक रघुवंशी वय ३२ व्यवसाय ट्रक चालक रा.जांबरोड मुलकी यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे तक्रार दिली की, फिर्यादी व ट्रकक्लीनर नामे दुर्गेश चिंध्या ढोमणे असे मध्यप्रदेश बैतुल येथील सुहापुर येथुन एम.पी. ४८ एच ०७८८ क्रमांकाचे ट्रक मध्ये २५ टन साखरेचा माल घेवुन यवतमाळ येथे बाभुळगांव मार्गे यवतमाळ येथे येत असतांना करळगांव घाट पार करुन बिडकर फार्म चे जवळ पोहचला असतांना आचानक एका कार मधुन सहा ते सात इसमांनी येवुन कार ट्रकला आडवी लावुन ट्रकमधील इसमांनी ट्रक चालक व क्लिनरला ट्रकचे खाली उतरवुन मारहान करत असतांना चालक योगेश हा बाजुचे जंगलात पळुन गेला त्यामुळे कारमधील इसमांनी ट्रक क्लीनर ला जबरदस्तीने कारमध्ये बसवुन जोडमोहा रोडने पाच सहा किलोमीटर लांबवर नेवुन सोडुन दिले व ट्रक, व दोन मोबाईल फोन दुसऱ्या मार्गाने घेवुन पळुन गेले. त्यानंतर फिर्यादी हा पायदळ पावसात यवतमाळ शहर पोलीस स्टेशनला येवुन आपबिती सांगीतली असता कर्तव्य अधिकारी यांनी ट्रक चोरी बाबतची माहिती वरिष्ठ अधिकारी, स्थानिकगुन्हे शाखा, व नियंत्रण कक्ष यवतमाळ चे मार्फतीने यवतमाळ, हायवे पोलीसांना तसेच लगतचे जिल्हयात देउन नाकेबंदी करण्यात आली. वरिष्ठांनी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर व स्थानिक गुन्हे शाखेचे आठ पथक स्थापन करुन त्यांना आदेशानुसार वेगवेगळया दिशेला रवाना करण्यात आले. पो.स्टे यवतमाळ शहरचे पथकांना मीळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे यवतमाळ शहरचे अधिकारी व अंमलदार यांनी तिन संशयीत इसमांना ताब्यात घेवुन त्यांना गुन्हयाबाबत विचारपुस केली असता संशयीत इसम नामे १) शशिकांत उर्फ जॅकी २) विक्की ३) लतीफ इतर तिन ते चार साथीदारांचे मदतिने गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने व फिर्यादीने सांगितलेला घटनाक्रम जुळत असल्याने व तांत्रीक माहितीच्या आधारे चोरी गेलेल्या ट्रक चा स्थागुशा व पोस्टे यवतमाळ शहरचे पथकांनी माग काढुन सदर ट्रक साखरेच्या मालासह वरोरा एम.आय.डी.सी परिसरात कोणासही लक्षात येणार नाही अशा स्थीतीत उभा असलेल्या ठिकाणावर साखरेच्या संपुर्ण मालासह किं. १०,००.०००/- रु व ट्रक एम.पी. ४८ एच ०७८८ किंमत १२,००,०००/- रु चा असा एकुण २२,००,०००/- रु चा जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात आज रोजी आरोपीतांना अटक करण्यात आली असुन उर्वरीत फरार आरोपींच्या शोधार्थ चार पथके रवाना करण्यात आली आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ.श्री.पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री.पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.संपतराव भोसले यांचे मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक श्री.विनायक कोते, दिनेश भैसाने, श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, श्री. नंदकिशोर पंत पोलीस निरीक्षक पो.स्टे यवतमाळ शहर, सपोनि सचिन लुले, जनार्दन खंडेराव पो.स्टे. यवतमाळ शहर, सपोनि विवेक देशमुख, पोउपनि राहुल गुहे स्थागुशा, नापोशी संतोष व्यास, भरत राठोड, किरण पडघन, रवि नेवारे, अंकुश फेंडर, सुनिल पैठणे, राजु कांबळे, मिलींद दरेकर सर्व पो.स्टे. यवतमाळ शहर पोहवा साजीद सैयद, अजय डोळे, बंडु डांगे, रुपेश पाली, विनोद राठोड, निलेश राठोड, रिजतुराज मेडवे, धनंजय श्रीरामे, चालक विवेक पेठे सर्व स्थागुशा व सायबर सेल ने केलेल्या सहकार्याने नमुद पथकांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**टिप - आरोपीतांची ओळख परेड घेणे असल्यानेपुर्णनावे उघडकरता येणार नाहीत**

( नंदकिशोर पंत )
पोलीस निरीक्षक
**पोलीसस्टेशन, यवतमाळ शहर**